ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com www.nandedwarta.blogspot.com
रौप्य महोत्सव २५
। वर्ष २५ वे । अंक २ । शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६ । नांदेड पोस्टपरवाना क्र.जी.-२/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ पाने ४ । मुल्य १ रु.

## निकष बाजूला सारुन दुष्काळ जाहीर करा - खा.शरद पवार

### शेतकरी, शेतमजुरांना तातडीने आर्थिक मदत करा

**मुंबई/प्रतिनिधी**–राज्यातील अनेक भागांत अपुऱ्या पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, औपचारिक निकषांची प्रतीक्षा न करता तत्काळ दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविले आहे. गंभीर तालुक्यांना दुष्काळसदृश घोषित करून दुष्काळी सवलती लागू



कराव्यात. शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार रुपये आणि शेतमजूर कुटुंबांना २५ हजार रुपये विशेष मदत द्यावी, अशी मागणी पवार यांनी केली आहे.शेतकऱ्यांना तातडीने पीककर्ज उपलब्ध करून देतानाच कर्जमाफी योजना लागू करावी. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहनपर अनुदान ५० हजारांवरून एक लाख रुपये करावे, तसेच थकीत पीककर्जदारांचाही कर्जमाफी योजनेत समावेश करावा, असे त्यांनी म्हटले आहे.पाणीटंचाईग्रस्त गावांत टँकर सुरू करावेत, चारा छावण्या उभाराव्यात आणि पशुधनासाठी पाणी व पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्यावी. फळबागांसाठीही टँकरची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.पीकविमा मदत तातडीने वितरित करावी, रोजगार हमीची विशेष कामे सुरू करावीत, वीज रोहित्र दुरुस्तीसाठी विशेष मोहीम राबवावी आणि दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी मागणीही पवार यांनी केली आहे.

## राज्यात दोन दिवस वादळी पावसाचा अंदाज

### नांदेडात पावसाच्या हलक्या सरी

**मुंबई/प्रतिनिधी**– गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने चिंतेत असलेल्या मराठवाड्यात अखेर पावसाचे पुनरागमन झाले आहे. परभणी, लातूर, हिंगोली, धाराशिव आणि जालना जिल्ह्यांसह नांदेड जिल्ह्यातही शुक्रवारी हलक्या पावसाच्या सरी कोसळल्या.

यंदा पदीर्घ प्रतिक्षेनंतर झालेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी पिकांसाठी अद्याप दमदार आणि सलग पावसाची आवश्यकता आहे. त्यामुळे दुष्काळाचे सावट कायम असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. काल परभणी जिल्ह्यात तब्बल ४० दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पावसाने हजेरी लावली. शुक्रवारी पहाटेपासून नांदेडसह मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात व राज्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी सुरू झाल्या. काही ठिकाणी पावसाची संततधारही पाहायला



मिळाली. त्यामुळे उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला असून ग्रामीण भागातही वातावरणात बदल झाला आहे. नांदेड शहरासह जिल्ह्यातील काही भागांत शुक्रवारी हलक्या पावसाच्या सरी कोसळल्या. पावसाने काही काळ हजेरी लावल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. मात्र, पावसाचे प्रमाण कमी असल्याने शेतीसाठी मोठ्या पावसाची गरज कायम आहे. दीर्घकाळाच्या पावसाच्या खंडामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आता पुढील पावसाकडे लागल्या आहेत. दरम्यान, बंगालच्या उपसागरातील हवामानातील बदलामुळे महाराष्ट्रात पावसाचे पुनरागमन होण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. २० ते २५ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्र आणि गोवा परिसरात पावसाच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच २०, २१ आणि २२ सप्टेंबर रोजी मराठवाड्यातील काही भागांत मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान सांगली, सातारा, कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता आहे. २१ सप्टेंबर रोजी नाशिकमध्येही मध्यम पावसाचा अंदाज आहे. अहिल्यानगर, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.मराठवाड्यात पावसाचे पुनरागमन झाले असले तरी शेतकऱ्यांना आता दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. पुढील तीन दिवसांत पावसाचे प्रमाण कसे राहते, याकडे शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## मराठवाड्याच्या विकासासाठी सजग पत्रकारितेची गरज–सुजात आंबेडकर

### कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानच्या पुरस्कारांचे शानदार सोहळ्यात वितरण

**नांदेड/प्रतिनिधी**– स्वातंत्र्यानंतरच्या ७८ वर्षातही मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरुन निघाला नाही. विकासासाठी सजग आणि निर्भिड पत्रकारितेसोबतच सजग नागरिकांची गरज असल्याचे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी केले.

दिवंगत कॉ.अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठानच्यावतीने दिल्या जाणाऱ्या जीवनगौरव, पत्रकारिता व प्रेरणादायी संघटक पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ.प्रविण पाटील हे तर प्रमुख पाहुणे म्हणून दै.प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे, माजी नगरसेवक ॲड.विनायकराव नांदेडकर, नांदेड मनपातील स्थायी समितीचे अध्यक्ष विरेंद्रसिंघ गाडीवाले, उद्योजक नौनिहालसिंघ जहागिरदार, मनपातील काँग्रेस व वंचित आघाडीचे गटनेते इंजि. प्रशांत इंगोले आदी उपस्थित होते. यावेळी गुरुद्वारा बोर्डाचे माजी अध्यक्ष तथा माजी नगरसेवक स.लड्डूसिंघ महाजन, किनवट नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान यांचा जीवनगौरव तर दै.श्रमिक एकजूट पुरस्कृत कॉ.अनंतराव नागापूरकर पत्रकारिता पुरस्कार लोह्याचे ज्येष्ठ पत्रकार रत्नाकर महाबळे, विडी व सफाई कामगार क्षेत्रातील उत्कृष्ट संघटक पुरस्कार कॉ.मिना हटकर व कॉ.वैशाली धुळे तर ग्राम रोजगार सेवक संघटनेतील उत्कृष्ट संघटक पुरस्कार कॉ.प्रकाश बैलकवाड यांना प्रदान करण्यात आला. यावेळी बोलतांना सुजात आंबेडकर म्हणाले की, मराठवाडा निझामाच्या गुलामगिरीतून मुक्त होवून ७८ वर्षे झाली. एकट्या मराठवाड्याने राज्याला तीन-तीन मुख्यमंत्री दिले. तरी देखील मराठवाड्याचा विकास होवू शकला नाही. मराठवाड्यातील शिक्षण, सिंचन, पाणी, उद्योगाचा अनुशेष दिवसेंदिवस वाढत आहे. विकासात माध्यमांची म्हणजे पत्रकारितेची महत्वाची भूमीका आहे. अलिकडच्या काळात अनेक मोठ्या साखळी माध्यमांवर अदानी, अंबानी सारख्या भांडवलदारांचे वर्चस्व आहे. त्यामुळे पत्रकारितेची विश्वासाहर्यता दिवसेंदिवस कमी होत आहे. मराठवाड्याच्या विकासाला खऱ्या अर्थाने सत्तेला जाब विचारणारे नागरिक आणि पत्रकारांची गरज आहे. नांदेड वार्ता सारखी बोटावर मोजण्या इतकी वृत्तपत्रे हे आपले काम प्रामाणिकपणे करीत आहेत. म्हणून गोदी मिडियाची चर्चा होवू लागली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाड्यातील




पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी नदी जोड प्रकल्पाची संकल्पना मांडली होती. त्यात छोटे-छोटे बंधारे बांधुन पाण्याचे सिंचन व्हावे असे अपेक्षित होते. परंतु मोठे धरणं बांधुन गुत्तेदारांची आर्थिक तहान भागली. मात्र या भागातील नागरिकांच्या घशाला पडलेली कोरड मात्र आपण कमी करु शकलो नाही अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी शंतनु डोईफोडे यांनी कॉ.अनंतराव नागापूरकर हे या भागातील कामगारांना पडलेले एक सुंदर स्वप्न होते. त्यांची भूमीका कामगारांसोबत उद्योगही वाचला पाहिजे अशी होती. असे कामगार नेते आता फार कमी आहेत. त्यांचा वारसा सांभाळणे कठीण असले तरी त्यांच्या विचारातून निर्माण झालेला लाल बावटा प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. सत्काराला उत्तर देतांना लड्डूसिंघ महाजन व इसाखान यांनी कॉ.अनंतराव नागापूरकर यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला. तर अध्यक्षीय समारोपात प्रविण पाटील यांनी सुजात आंबेडकर सारख्या तरुणांनी केवळ राजकारणात नाही तर सत्तेत सहभागी झाले पाहिजे असे मत व्यक्त करतांना केवळ घराणेशाही म्हणून नाही तर उच्च शिक्षित लोकांनी राजकारणात आणि सत्ताकारणात येण्याची आता खऱ्या अर्थाने गरज आहे. कॉ. अनंतराव नागापूरकर हे उच्च शिक्षित असूनही कामगार, कष्टकऱ्यांसाठी आयुष्यभर लढले. त्यांचा वारसा नांदेडमध्ये कॉ.प्रदीप पुढे नेत आहेत,असे गौरवोद्गार काढत नांदेड वार्ताच्या वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.कॉ.प्रदीप नागापूरकर यांनी तर फारुख अहमद यांनी मनोगत केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन पत्रकार राम तरटे यांनी केले. पुरस्कारार्थींच्या मानपत्राचे वाचन अविनाश पाटील, राज गोडबोले, कॉ.देवराव नारे, कॉ.उज्वला पडलवार, सदानंदी नागापूरकर, कॉ.प्रफुल्ल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार रविंद्रसिंघ मोदी, वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे राज्य उपाध्यक्ष बालाजी पवार, कॉ.शिवाजी फुलवळे, प्रसाद नागापूरकर, कॉ. गणेश संदुपटला, हुसेन शेख, सय्यद मलंग, कॉ.भगवान नाईक, एन.टी. कांबळे, संजय लष्करे, नागसेन डोंगरे आदींनी प्रयत्न केले.






संपादकीय

# मराठवाड्याची पुन्हा उपेक्षा

१७ सप्टेंबर हा मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले, मात्र निजामाच्या हैदराबाद संस्थानातून मराठवाड्याला मुक्त होण्यासाठी आणखी तेरा महिने संघर्ष करावा लागला. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाची राजवट संपुष्टात आली आणि मराठवाडा स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग झाला. हा केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नाही, तर स्वातंत्र्यासाठी लढलेल्या असंख्य ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाची आठवण करून देणारा दिवस आहे.हैदराबाद संस्थान भारतात विलीन व्हावे, यासाठी मराठवाड्यातील जनतेने मोठा संघर्ष केला. भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनातही या भागातील लोक सहभागी झाले होते. निजामशाही विरोधातील लढा हा केवळ राजकीय सत्तेविरुद्धचा नव्हता, तर स्वाभिमान, लोकशाही आणि स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष होता. त्यामुळे भारत स्वतंत्र झाल्यानंतरही निजामाच्या राजवटीखाली राहिलेल्या मराठवाड्याला भारतात सामील होण्याची तीव्र इच्छा असणे स्वाभाविक होते.हैदराबाद संस्थानाच्या विविध भागांत वेगवेगळ्या स्वरूपाचे संघर्ष उभे राहिले होते. तेलंगणात जमीनदारशाही विरोधात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली सशस्त्र संघर्ष उभा राहिला होता. दुसरीकडे मराठवाड्यात निजामशाही विरोधात स्वातंत्र्याची चळवळ तीव्र होत होती. या सर्व परिस्थितीचा शेवट भारत सरकारच्या 'ऑपरेशन पोलो'नंतर झाला आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.मुक्तीनंतर मराठवाड्याने महाराष्ट्राच्या निर्मितीतही कोणताही संकोच दाखविला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठवाड्यातील अनेक नेते आणि कार्यकर्ते सहभागी झाले. भाषावार प्रांतरचनेच्या मागणीला पाठिंबा देत मराठवाडा संयुक्त महाराष्ट्रात सामील झाला. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतरही मराठवाडा हा तुलनेने मागासलेला प्रदेश म्हणूनच राहिला. त्यामुळे विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाने विशेष लक्ष देणे ही या भागाची रास्त अपेक्षा होती.याच पार्श्वभूमीवर मराठवाड्यात राज्य मंत्रिमंडळाची बैठक घेण्याची परंपरा सुरू झाली. मंत्रिमंडळाची बैठक मराठवाड्यात भरवून या प्रदेशातील विकासाच्या प्रश्नांवर थेट निर्णय घ्यावेत, निधीची तरतूद करावी आणि रखडलेल्या योजनांना गती द्यावी, अशी त्यामागची भूमिका होती. बैठका झाल्या, घोषणा झाल्या; मात्र त्या घोषणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती झाली, हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. तरीही वर्षातून एकदा राज्याचे संपूर्ण मंत्रिमंडळ मराठवाड्यात येते, या गोष्टीमुळे या प्रदेशातील जनतेला शासन आपल्याकडे गांभीर्याने पाहत आहे, असा आशावाद निर्माण होत होता.मात्र गेल्या काही काळात ही परंपरा खंडित होताना दिसत आहे. २०२३ मध्ये मराठवाड्यासाठी मोठ्या आर्थिक पॅकेजची घोषणा करण्यात आली होती; त्यातील अनेक प्रकल्प पुढे कागदोपत्रीच राहिल्याची बातमी २०२५ मध्ये प्रसिद्ध झाली होती. २०२५ मध्येही मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक न झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते.यंदा तर परिस्थिती अधिक गंभीर होती. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर प्रदेशात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, चारा आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न यामुळे मराठवाड्याला विशेष मदतीची गरज होती. त्यामुळे १७ सप्टेंबरच्या आसपास छत्रपती संभाजीनगर येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक घेऊन तातडीच्या उपाययोजना जाहीर कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १७ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे ध्वजारोहण करून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प व्यक्त केला. पीक नुकसानीचे पंचनामे आणि शेतकऱ्यांना मदतीबाबतही त्यांनी आश्वासन दिले. या घोषणा निश्चितच महत्त्वाच्या आहेत. मात्र मराठवाड्याच्या प्रश्नाकडे पाहण्याची गरज केवळ दुष्काळापुरती मर्यादित नाही. सिंचन, उद्योग, रोजगार, शिक्षण, आरोग्य, पाणी, शेती आणि पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांतील अनुशेष दूर करण्यासाठी दीर्घकालीन आणि ठोस कृती आराखडा आवश्यक आहे.मुक्तिसंग्राम दिनाच्या दिवशी मराठवाड्याच्या शौर्याचा इतिहास सांगणे आवश्यकच आहे; पण इतिहास सांगून वर्तमानाचे समाधान होत नाही. या दिवसाचे खरे औचित्य तेव्हाच साधले जाईल, जेव्हा मराठवाड्याच्या भविष्यासाठी ठोस निर्णय घेतले जातील. स्वातंत्र्यासाठी कोणत्याही अटी न घालता महाराष्ट्रात सामील झालेल्या या प्रदेशाला विकासाच्या वेळी मात्र दुय्यम स्थान मिळत असेल, तर हा प्रश्न केवळ राजकीय नाही; तो मराठवाड्याच्या आत्मसन्मानाचा आहे.मराठवाड्याने महाराष्ट्राला आपले मानले. आता महाराष्ट्र सरकारनेही मराठवाड्याला केवळ निवडणुकीच्या किंवा मुक्तिदिनाच्या कार्यक्रमापुरते न पाहता विकासाच्या केंद्रस्थानी ठेवण्याची वेळ आली आहे. अन्यथा दरवर्षी १७ सप्टेंबरला हुतात्म्यांना अभिवादन केले जाईल, इतिहास सांगितला जाईल; पण मराठवाड्याच्या वर्तमानाचा प्रश्न मात्र तसाच अनुत्तरित राहील.मुक्तिसंग्रामाच्या हुतात्म्यांना खरी आदरांजली म्हणजे भाषण नव्हे, तर मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष प्रत्यक्ष कृतीतून भरून काढणे होय.



# मी पाहिलेले कॉ.अनंतराव नागापूरकर

ॲड.संजय रुईकर
सचिव, आर.सी.एम.टी.ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स,
विष्णुपुरी, नांदेड

स्वातंत्र्य सैनिक, कामगार नेते आणि परिवर्तनवादी चळवळीचा नांदेडमधील धगधगता अध्याय काही माणसे काळाच्या प्रवाहाबरोबर जगतात; काही माणसे मात्र काळाला दिशा देतात. त्यांच्या आयुष्याचा विचार केला की एखाद्या व्यक्तीची चरित्रकथा डोळ्यांसमोर येत नाही, तर एका युगाचा संघर्ष, एका विचाराची निष्ठा आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी झिजलेले संपूर्ण आयुष्य उभे राहते. कॉम्रेड अनंतराव शंकरराव नागापूरकर हे अशाच धगधगत्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक.

६ ऑक्टोबर १९२० रोजी बीड जिल्ह्यातील मांडवा येथे त्यांचा जन्म झाला. अंबेजोगाईच्या योगेश्वरी विद्यालयात शिक्षण घेत असतानाच त्यांच्या मनावर समाजवादी विचारांचा प्रभाव पडला. पुढे हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठात शिक्षण घेत असताना त्यांच्या आयुष्याला स्वातंत्र्य लढ्याची आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा मिळाली.कॉ. अनंतराव नागापूरकर म्हणजे केवळ एक कम्युनिस्ट कार्यकर्ता नव्हते. ते स्वातंत्र्य सैनिक होते, कामगारांचे नेते होते, नगरसेवक होते आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत आपल्या विचारांशी प्रामाणिक राहिलेले परिवर्तनवादी योद्धे होते.

**निजामशाही विरुद्धचा निर्भय लढा**

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला; पण हैदराबाद संस्थानातील जनतेला स्वातंत्र्याची पहाट त्याच दिवशी लाभली नाही. निजामाची राजवट कायम होती आणि भारतीय तिरंगा फडकावण्यावर बंदी होती.अशा परिस्थितीत कॉ. अनंतराव नागापूरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चंचलगुडा बसस्थानकावर तिरंगा फडकावला. हा केवळ ध्वजारोहणाचा कार्यक्रम नव्हता; तो निजामशाहीला दिलेला उघड आव्हान होता. स्वातंत्र्य आणि हैदराबाद मुक्तिसंग्रामातील सहभागामुळे त्यांना ब्रिटिश आणि निजाम सरकारकडून मिळून सुमारे साडेपाच वर्षे तुरुंगवास भोगावा लागला.

आज स्वातंत्र्य सहज मिळालेले वाटते. परंतु त्या स्वातंत्र्यामागे तुरुंगाच्या काळोख्या कोठड्या, पोलिसांचा छळ, उपासमार, अनिश्चित भविष्य आणि मृत्यूची भीती न बाळगणारी माणसे होती. नागापूरकरांचे नाव या संघर्षाच्या इतिहासात म्हणूनच आदराने घ्यावे लागते.तुरुंगातून बाहेर आले आणि पुन्हा संघर्षाच्या मैदानात उतरले. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर अनेकांना आपले आयुष्य स्थिर करावेसे वाटले असते. परंतु नागापूरकरांच्या जीवनाचा संघर्ष तिथे संपला नाही.

नांदेडकरांनी त्यांना तत्कालीन नगरपालिकेत दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून दिले. ही निवड केवळ राजकीय लोकप्रियतेची नव्हे, तर जनतेशी असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्याची पावती होती.नगरसेवक म्हणून पद मिळाले, म्हणून त्यांनी सत्तेचा उपभोग घेतला नाही; उलट सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना आवाज देणे हेच आपले कर्तव्य मानले. नांदेडच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी केलेल्या योगदानाची नोंद आजही महानगरपालिकेच्या अधिकृत दस्तऐवजांत आढळते.

**कामगारांसाठी आयुष्य वाहिले**

कॉ.अनंतराव नागापूरकरांच्या जीवनाचा सर्वात महत्त्वाचा अध्याय म्हणजे कामगार चळवळ.कामगार म्हणजे केवळ कारखान्यात किंवा गिरणीत काम करणारा हात नव्हे, तर आपल्या श्रमातून समाजाची आणि अर्थव्यवस्थेची उभारणी करणारा माणूस आहे, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. कामगाराला योग्य वेतन, सुरक्षित कामाचे वातावरण, सन्मान आणि सामाजिक न्याय मिळाला पाहिजे, यासाठी त्यांनी संघटनात्मक लढा उभारला.

नांदेडच्या औद्योगिक आणि कामगार क्षेत्रात त्यांनी संघटना उभी केली.आयटकच्या ऐतिहासिक दस्तऐवजांत उस्मानशाही मिल वर्कर्स युनियन, वजिराबाद, नांदेड यांच्याशी त्यांचे नाव जोडलेले आढळते. म्हणूनच त्यांना केवळ 'कम्युनिस्ट नेते' म्हणून पाहणे त्यांच्या कार्याला मर्यादित करण्यासारखे ठरेल. ते श्रमिकांच्या जगण्याच्या प्रश्नांना सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणणारे कामगार नेते होते.

**कम्युनिस्ट पक्षाची चळवळ आणि वैचारिक निष्ठा**

राजकारणात विचार बदलणे सोपे असते; पण विचारांवर आयुष्य उभे करणे कठीण असते.कॉ. अनंतराव नागापूरकरांनी हा कठीण मार्ग स्वीकारला.कम्युनिस्ट पक्षाच्या चळवळीशी त्यांची बांधिलकी केवळ राजकीय सोयीपुरती नव्हती. समाजवाद, श्रमिकांचे हक्क, आर्थिक विषमता आणि शोषणमुक्त समाजव्यवस्था या विचारांशी ते आयुष्यभर जोडलेले राहिले.

आयटकच्या राष्ट्रीय पातळीवरील ऐतिहासिक नोंदींमध्येही त्यांचे नाव आढळते.१९६३ च्या आयटक अधिवेशनाच्या नोंदीत त्यांचा उल्लेख जनरल कौन्सिलच्या सदस्यांमध्ये असून, त्या काळातील त्यांच्या संघर्षशील सार्वजनिक जीवनाची नोंद तेथे आढळते.

**मी पाहिलेले कॉ.अनंतराव नागापूरकर**

कॉ.अनंतराव नागापूरकरांविषयी लिहिताना माझ्यासाठी हा विषय केवळ ऐतिहासिक नाही. त्यांच्या जीवनातील काही क्षण मला स्वतः ला अनुभवता आले आहेत, ही माझ्यासाठी आयुष्यभराची जपणूक आहे.कॉ.अनंतराव नागापूरकर यांचे कनिष्ठ चिरंजीव प्रदीप नागापूरकर हे माझे लॉचे क्लासमेट. या मैत्रीमुळे नागापूरकर कुटुंबाशी माझा जवळचा परिचय झाला आणि त्यांच्या घरी माझे सातत्याने येणे–जाणे असायचे. त्यातूनच आयुष्याच्या शेवटच्या वळणावर असलेल्या कॉ. अनंतराव नागापूरकरांचा मला जवळून सहवास लाभला.

तो सहवास माझ्यासाठी केवळ एका ज्येष्ठ व्यक्तीला भेटण्यापुरता नव्हता.तो एका चळवळीच्या इतिहासाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा अनुभव होता.मी तासन्तास त्यांच्याजवळ बसायचो. गप्पा मारायचो. तेही मन मोकळेपणाने बोलायचे. त्यांच्या बोलण्यात भूतकाळ होता, संघर्ष होता, अनुभव होता; पण त्याचबरोबर वर्तमानाविषयीची अस्वस्थताही होती.त्यांच्याशी बोलताना त्यांच्या अंगी असलेली शिस्त, स्पष्टवक्तेपणा आणि तत्त्वनिष्ठा प्रकर्षाने जाणवायची. वयाच्या उत्तरार्धात शरीर थकले असले, तरी विचारांची धार मात्र तशीच होती.

ते बोलताना कुठेही दिखाऊपणा नव्हता. स्वतःच्या त्यागाची किंवा तुरुंगवासाची शेखी नव्हती. उलट त्यांनी अनुभवलेल्या संघर्षापेक्षा त्यांना सतत चिंता होती ती कामगारांच्या राहून गेलेल्या प्रश्नांची. त्यांच्या मनात एक प्रकारची खंत होती कामगारांसाठी अजून अनेक गोष्टी करायच्या राहून गेल्या.ही भावना त्यांच्या बोलण्यातून पुन्हा पुन्हा जाणवायची.

कामगारांच्या व्यथा ते मनापासून सांगायचे. एखाद्या कामगाराला मिळणारे अपुरे वेतन, त्याच्या कुटुंबाची परिस्थिती, कामाच्या ठिकाणी होणारा अन्याय, असुरक्षितता, संघटित होण्यातील अडचणी या सगळ्या प्रश्नांकडे ते केवळ राजकीय विषय म्हणून पाहत नसत. कामगाराच्या घरातील चुलीशी आणि त्याच्या मुलांच्या भविष्याशी जोडलेला प्रश्न म्हणून ते त्याकडे पाहत.त्यांचे बोलणे ऐकताना मला अनेकदा जाणवायचे की हा माणूस निवृत्त झालेला नाही; त्याचे शरीर कदाचित थकले आहे, पण त्याच्या मनातील कामगार चळवळ अजूनही जिवंत आहे.

तासन्तास चालणाऱ्या त्या गप्पांमध्ये नांदेडचा जुना सामाजिक आणि राजकीय पट माझ्यासमोर उलगडत जायचा. चळवळीतील सहकारी, कामगारांचे प्रश्न, संघर्षाचे दिवस, तुरुंगातील अनुभव, पक्षाचे काम आणि सामान्य माणसाशी असलेले नाते, या सगळ्यांच्या आठवणी ते सांगायचे.त्यांच्या बोलण्यातून मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली.त्यांनी राजकारण केले नाही; त्यांनी विचार जगला.आजच्या काळात ही गोष्ट अधिक महत्त्वाची वाटते.

**त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील शिस्त**

कॉ.अनंतराव नागापूरकरांच्या व्यक्तिमत्त्वातील शिस्त मला विशेष भावली.शिस्त म्हणजे केवळ वेळेचे बंधन किंवा बाह्य वर्तन नव्हे. त्यांच्या दृष्टीने शिस्त म्हणजे विचारांशी प्रामाणिक राहणे.कम्युनिस्ट पक्षाशी असलेली त्यांची निष्ठा, कामगारांच्या प्रश्नांविषयीची बांधिलकी आणि सामान्य माणसाच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका त्यांनी परिस्थितीनुसार बदलली नाही. त्यांचा स्पष्टवक्तेपणा अनेकांना कठोर वाटू शकत होता; परंतु त्यांच्या स्पष्ट शब्दांमागे वैयक्तिक आकस नसायचा. व्यक्तीपेक्षा विचार मोठा आणि स्वार्थापेक्षा समाज मोठा, ही त्यांची भूमिका होती.

**नांदेडकरांनी दिलेला सन्मान**

कॉ.अनंतराव नागापूरकरांच्या कार्याचे महत्त्व इतके मोठे होते की,त्यांच्या स्मृतीला नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने संस्थात्मक सन्मान दिला.विनायकनगर येथील रुग्णालयाला 'दिवंगत कॉ. अनंतराव शंकरराव नागापूरकर स्मृती रुग्णालय' असे नाव देण्याचा ठराव महानगरपालिकेने सर्वानुमते मंजूर केला. या ठरावात त्यांना 'थोर स्वातंत्र्य सैनिक' आणि 'प्रख्यात कामगार नेते' असे संबोधून नांदेडच्या विकासातील त्यांच्या योगदानाची नोंद करण्यात आली आहे.एखाद्या व्यक्तीच्या नावाने एखाद्या सार्वजनिक संस्थेला नाव देणे हा केवळ औपचारिक सन्मान नसतो. तो त्या व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनाला समाजाने दिलेला कृतज्ञतेचा सलाम असतो.

**आजच्या पिढीने काय शिकावे?**

आज राजकारण म्हणजे पद, सत्ता, प्रसिद्धी आणि सोशल मीडियावरील प्रतिमा असे समीकरण अनेकदा दिसते. अशा काळात अनंत नागापूरकरांचे आयुष्य वेगळे प्रश्न विचारते,विचारांसाठी आपण किती त्याग करू शकतो? सामान्य माणसाच्या प्रश्नासाठी किती वेळ देऊ शकतो? अन्यायाविरोधात उभे राहण्याची आपली तयारी किती आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे आपल्या विचारांशी शेवटपर्यंत प्रामाणिक राहण्याचे धैर्य आपल्यात आहे का?

नागापूरकरांनी स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास सहन केला. स्वातंत्र्यानंतरही त्यांनी संघर्ष सोडला नाही. त्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी लढा दिला, नांदेडच्या सार्वजनिक जीवनात योगदान दिले आणि कम्युनिस्ट चळवळीशी अखेरपर्यंत निष्ठा राखली.त्यांच्या आयुष्याची खरी श्रीमंती त्यांच्या नावावर जमा झालेल्या संपत्तीत नव्हती; ती त्यांनी उभ्या केलेल्या माणसांच्या विश्वासात होती.

**इतिहास विसरला तर वर्तमान अपुरे राहते**

नांदेडचा इतिहास केवळ राजकीय पदांवर असलेल्या व्यक्तींच्या नावांनी पूर्ण होत नाही. या शहराचा सामाजिक इतिहास घडवणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांचा त्यात वाटा आहे. अनंतराव नागापूरकर हे त्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व आहेत.त्यांचे जीवन सांगते की स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्तता नव्हे; तर गरिबी, शोषण, अन्याय आणि विषमतेपासून माणसाची मुक्तता हाही स्वातंत्र्याचा व्यापक अर्थ आहे.

आज त्यांच्या आठवणी जागवताना माझ्या डोळ्यांसमोर त्यांचे घर, प्रदीपसोबतच्या माझ्या मैत्रीमुळे झालेल्या त्या भेटी, त्यांच्याजवळ तासन्तास बसून ऐकलेल्या गप्पा आणि कामगारांच्या प्रश्नांविषयी बोलताना त्यांच्या आवाजातील कळकळ पुन्हा उभी राहते.काळ पुढे गेला. माणसे निघून गेली. चळवळींचे स्वरूप बदलले. राजकारण बदलले. पण काही व्यक्तिमत्त्वे काळाच्या पलीकडे जातात.कॉ.अनंतराव नागापूरकर हे माझ्यासाठी असेच एक व्यक्तिमत्त्व आहेत.त्यांच्या हातात बंदूक नव्हती; त्यांच्या हातात विचारांचा लाल झेंडा होता.त्यांच्याकडे मोठी संपत्ती नव्हती; पण जनतेचा विश्वास होता. त्यांच्याकडे सत्तेची ताकद नव्हती; पण सत्यासाठी उभे राहण्याचे धैर्य होते.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या वळणावरही कामगारांच्या प्रश्नांची चिंता त्यांच्या मनातून गेली नव्हती. म्हणूनच माझ्या स्मरणातील अनंत नागापूरकर हे केवळ एक स्वातंत्र्यसैनिक किंवा कामगार नेते नाहीत. ते नांदेडच्या श्रमिक इतिहासाचे, परिवर्तनवादी चळवळीचे आणि तत्त्वनिष्ठ सार्वजनिक जीवनाचे जिवंत प्रतीक आहेत.त्यांचा सहवास लाभला, त्यांच्या तोंडून त्यांच्या काळाचा इतिहास ऐकता आला, ही माझ्या आयुष्यातील एक मौल्यवान आठवण आहे.

कॉ.अनंतराव नागापूरकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड–१
मुख्यसंपादक–प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक–अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com










हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४

कॉ. अनंतराव नागापूरकर प्रतिष्ठाणच्या वतीने जिवन गौरव सन्मान सोहळा व सायं. दै. नांदेड वार्ताच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित प्रकाशन सोहळ्यातील क्षणचित्रे.













नांदेड वार्ताच्या रौप्य महोत्सव वर्षानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

पंडित दीनदयाळ उपाध्याय सेवा प्रतिष्ठान वसंतनगर, नांदेड संचालित
राणी लक्ष्मीबाई हायस्कूल, नरसी
राणी लक्ष्मीबाई कनिष्ठ महाविद्यालय, नरसी
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ केंद्र, नरसी
BA- I, II, III
सुसज्ज इमारत, भव्य परांगण, सुसज्ज ग्रंथालय
प्रत्येक विद्यार्थ्यांकडे वैयक्तीक लक्ष, उज्वल यशाची परंपरा कायम
प्रकाशक : सौ. अनिताताई गोपछडे
जिल्हाध्यक्ष : भारतीय जनता पार्टी महिला आघाडी
प्राचार्या : राणी लक्ष्मीबाई ज्यु. कॉलेज, नरसी

सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सव वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
घड्याळ तेच वेळ नवी
हनुमंत पाटील किरोळे
चेअरमन : से.स.सो. हसनाळी
सौ. योगिता हनुमंत किरोळे
सरपंच : ग्रा.पं.का. हसनाळी

सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सव वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
संस्कृती डिजीटल इंग्लिश स्कूल, देगलूर
मुख्याध्यापक : सौ. स्वाती बोडके मॅ.

सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
सुनिल सादलापुरे
वैजनाथ सादलापुरे
शासकीय कंत्राटदार, कंधार

सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त
तसेच यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
श्री क्लिनिक
पोलिस स्टेशन रोड, धर्माबाद
डॉ.संजीव पोशट्टी लोलापोड

नांदेड जिल्ह्यातील अग्रगण्य
सायं दैनिक नांदेड वार्ताच्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शिवसेना
- शुभेच्छुक -
गणेश गिरी
शिवसेना (उबाठा),
जिल्हा उपप्रमुख, नांदेड

# एफडीएच्या धाडीत ५६ लाखांचा अन्नसाठा जप्त

## प्रतिष्ठित आस्थापनांवर धडक कारवाई



**पुणे :** नियमबाह्य लेबलिंग तसेच भेसळीचा संशय किचनमधील प्रचंड घाण अशा त्रुटी आढळल्याने तुकाराम मुंडे यांच्या नियंत्रणात असलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाने (एफडीए) टाकलेल्या धाडीत सुमारे ५६ लाख ३६ हजार रुपये किमतीचा संशयास्पद अन्नसाठा जप्त करण्यात आला.ग्राहकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या खाद्य आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा एफडीएच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे.

गणेशोत्सव आणि आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पुणे एफडीएने १० ते १५ सप्टेंबरदरम्यान विशेष तपासणी मोहीम राबवली. पुणे शहर, उपनगर आणि ग्रामीण भागातील हॉटेल्स, मिठाईची दुकाने, बेकऱ्या व रेस्टॉरंट्सची तपासणी करण्यात आली.या धाडीमध्ये पुणे क्लबसारख्या प्रतिष्ठित आस्थापनावर अस्वच्छतेच्या कारणामुळे ५६ लाखांचा अन्नसाठा एफडीएने जप्त केला. पुण्यातील कॅम्प परिसरातील प्रतिष्ठित द न्यू पूना क्लबच्या स्वयंपाकघरात गंभीर अस्वच्छता आढळून आल्याने अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) क्लबचा अन्न परवाना तत्काळ निलंबित केला. एफडीएच्या अचानक तपासणीत किचनमध्ये जिवंत झुरळे व किडे, उंदराची विष्ठा, सांडपाणी तसेच तेलकट आणि अस्वच्छ परिसर आढळून आला.

अन्नपदार्थ ठेवण्यात येणाऱ्या शीतकपाटाजवळच अस्वच्छ शौचालय असल्याचेही तपासणीत समोर आले. दरम्यान, हडपसर, मोहम्मदवाडी, वानवडी, कोंढवा, कॅम्प तसेच दौंड, मंचर आणि शिरूर परिसरातील १४ खाद्य आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. खाद्यपदार्थांच्या पॅकिंगवर आवश्यक माहिती नसणे आदी आक्षेपार्ह बाबी आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# दहावी-बारावीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

## बारावीची ८ तर दहावीची १५ फेब्रुवारीपासून परीक्षा



**मुंबई/प्रतिनिधी**-महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करता यावे आणि परीक्षेचा ताण कमी व्हावा, या उद्देशाने लेखी तसेच प्रात्यक्षिक परीक्षांच्या संभाव्य तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत.

राज्य मंडळाच्या माहितीनुसार, बारावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होतील. बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १६ मार्च या कालावधीत घेण्यात येणार आहे.तर दहावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत होतील. दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत होणार आहे.दहावी आणि बारावीच्या विषयनिहाय परीक्षांचे वेळापत्रक राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली आहे.

















